**<u>फौजदारी किरकोळ अर्ज ५०/२०२६ मधील नि.१ खालील आदेश</u>**
**<u>प्रशांत आरु ..वि.. सरकार तर्फे पोलीस स्टेशन वाशिम ग्रामिण</u>**

अर्जदार यांनी सदरचा अर्ज पोलीस स्टेशन, वाशिम ग्रामिण यांच्याकडे जप्त असलेली ट्रॉली त्यांना परत मिळणेसाठी भारतीय न्याय सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ४९७, ५०३ अन्वये केला आहे.

**<u>अर्जदारा याचे कथन थोडक्यात असे की:</u>**

(२) अर्जदार हा शेतीचा व्यवसाय करत असून अर्जदार यांच्याकडे शेती कामाकरिता लाल रंगाची एल.एम.व्ही. ट्रोली जिचा नोंदणी क्र.एम.एच.–२८–ई–८८१५ असून जिचा चेसीस क्र.व्ही.एफ.डब्ल्यु.८२१.०१.२०१४ हा आहे. अर्जदार हा सदर ट्रोलीचा कायदेशीर मालक आहे. गैरअर्जदार यांनी अप.क्र.१७३/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस.२०२३ अन्वये जप्त केलेले आहे. सदर ट्रोलीची अंदाजे किंमत रु.५,००,०००/– आहे. सदर ट्रोलीला ऑईल पाणी करणे व नियमित चालविणे गरजेचे आहे अन्यथा तिचे टायर निकामी होण्याची शक्यता नाकारला येत नाही. अर्जदाराला शेतीच्या कामाकरिता नितांत आवश्यकता आहे. तसेच अर्जदाराने सदर ट्रोली ही दि.०१/०७/२०१४ रोजी दिपाली आखाडे यांच्याकडून विकत घेतली याबाबतचे नि.क्र.७ वरील प्रतिज्ञापत्र प्रस्तुत प्रकरणात दाखल केले आहे. न्यायालयाने ट्रोली ही योग्य त्या अटीवर अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास अर्जदार हा न्यायालयाने लादलेल्या अटींचे तंतोतंत पालन करण्यास तयार आहे. तरी सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. अर्जदार यांनी मुळ अर्जासोबत खालील कागदपत्रे दाखल केलेले आहे.

१) नमुना नंबर २३ नोंदणी प्रमाणपत्र

२) अर्जदाराच्या आधार कार्डची छायांकीत प्रत.

३) एफ.आय.आर. ची छायांकीत प्रत.

४) अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र.

**(३)** याकामी तपासी अधिकारी व सरकार पक्षाचे म्हणणे विचारण्यात आले. तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि.०५ कडे सादर करुन योग्य त्या अटी व शर्तींवर अर्जदारास सदर मुद्देमाल ताब्यात देणेस त्यांची काही हरकत नसल्याचे कथन करुन योग्य तो आदेश होण्यास विनंती केली आहे. तर सरकारी वकीलांनी आपले म्हणणे देवून तिव्र विरोध दर्शविला आहे. तसेच सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असून अर्जदार हे तक्रारदारही नाहीत तसेच आरोपीही नाहीत. सदर अर्जदाराचे नाव हे प्रथम खबरी अहवालामध्ये नमूद नाही. सदर जप्त केलेला मुद्देमाल हा तपासामध्ये मिळुन आल्याने पुरावा म्हणून ठेवणे आवश्यक आहे. तसेच जप्त केलेल्या मुद्देमालाच्या मालकीबाबत कागदपत्राची पडताळणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**(४)** सदर अर्जावर सरकार पक्षाचा व अर्जदाराच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या समर्थनात यादी नि.०३ प्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत. कागदपत्राचे अवलोकन केले असता, अर्जदार हा सदर वाहनाचा ताबेदार असल्याचे दिसून येते. सदर जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनला राहिल्यास नुकसान होण्याची जास्त शक्यता आहे. याउलट तपासी अधिकारी यांनी देखील सदर जप्त मुद्देमाला अर्जदार यांना अटी व शर्तीवर देण्यास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे. अर्जदार व्यतिरिक्त सदर जप्त वाहनाबाबत कोणीही मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास

पुढील अटींवर व सुपूर्दनामा बंधपत्रावर देणे योग्य होईल. तरी मी पुढील आदेश पारित करत आहे:

## आदेश

१) सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदारास अपराध क्रं.१७३/२०२६ मधील पोलीस स्टेशन, वाशिम ग्रामीण यांनी वर नमूद जप्त केलेले ट्रोली अर्जदारास क्षतीपूर्ती बंधपत्र रक्कम रु.५,००,०००/– (पाच लाख फक्त) चे स्वीकारुन अंतरीम स्वरुपात परत देण्यात यावे.

**अ)** सदर जप्त मुद्देमालाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये.

**ब)** सदर जप्त मुद्देमाल न्यायालय ज्या ज्या वेळी आदेश करतील त्या त्या वेळी अर्जदारने न्यायालयात हजर करणेचे आहे.

३) सदरील जप्त मुद्देमालाचा पंचनामा सविस्तर करुन क्षतीपूर्ती बंधपत्रासहीत न्यायालयात दोषारोपपत्रासोबत दाखल करावा.

४) जर अर्जदारने कोणत्याही एका अटीचा भंग केला तर त्याने लिहून दिलेले क्षतीपूर्ती बंधपत्र जप्त करुन बंधपत्राची रक्कम त्याचेकडून वसूल करुन सरकार जमा केली जाईल.

५) तपासी अधिकारी यांनी जप्त मुद्देमाल याचे चारही बाजूने फोटो काढून दोषारोपपत्रासोबत दाखल करण्याचे आहे. सदर फोटोचा खर्च अर्जदार यांनी करावा.

६) पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, वाशिम ग्रामीण यांना आदेशित करण्यात येते की, अर्जदारास कागदपत्रांची पडताळणी करुन उपरोक्त जप्त मुद्देमाल ताब्यात द्यावा.

DINESH MUKUND GAIKWAD

Digitally signed by DINESH MUKUND GAIKWAD
Date: 2026.03.18 17:06:26 +0530

रिसोड (दिनेश. मु. गायकवाड)

दिनांक :१८/०३/२०२६. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.२, रिसोड.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order are same word to word, as per the original **Judgment/Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | B. V. Bhisade, (Grade-III) |
| Name of court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Risod. |
| Date | : | 18.03.2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 18.03.2026 |
| **Order uploaded on** | **:** | **18.03.2026** |